
नाट्य, नृत्य, संगीत प्रधान
कौटुंबिक ग्रामीण नाटक
जयवंत वालावलकर
लिखित
बेलभंडार



CENTRE FOR FUNDAMENTAL RESEARCH

नाट्य, नृत्य, संगीतप्रधान
कौटुंबिक ग्रामीण नाटक

# बेल भंडार

लेखक

जयवन्त वालावलकर

सुधारित किंमत
रु. ४/-

मूल्य [illegible] रुपये

---

एकमेव विक्रेते:–

रसिक साहित्य
अप्पाबळवंत चौक,
पुणे ३०.

प्रकाशक:–

अनमोल प्रकाशन
अप्पाबळवंत चौक,
पुणे २

प्रकाशक
**मो. द. नांदुरकर**
अनमोल प्रकाशन ६८३ बुधवार
अप्पा बळवंत चौक, पुणे. २

प्रयोगाबाबतचे आणि
प्रथमावृत्तीनंतरच्या
प्रकाशनाबाबतचे
सर्व हक्क
सौ. क्षमा जयवंत वालावलकर
६४८ बुधवार, पुणे २
यांच्या स्वाधीन आहेत.

**मुखपृष्ट**
"स्टुडिओ प्रभा ॲडव्हर्टायझर्स" पुणे

छाया:–
र. शि. खानोलकर

प्रथमावृत्ति ४ सप्टेंबर १९७०
सौर १३ भाद्रपद शके १८९२
( श्री गणेश चतुर्थी )

मुद्रक
**वि. ना. भंडारे**
**स्वानंद मुद्रणालय**
२०३ शनिवार पेठ
पुणे ३०

## सूचना अत्यंत महत्वाची

" **महाराष्ट्रराज्य नाट्य-स्पर्धा** " **तच** (शहरी अथवा ग्रामीण) फक्त लेखकाच्या लेखी अनुज्ञेने " **बेल भंडार** " चा प्रयोग करतां येईल.

त्या शिवाय, जोपर्यंत " मल्हार रंगमंच " (पुणे.) ही नाट्यसंस्था, या नाटकाचे प्रयोग करणार आहे, तो पर्यंत अन्य कुणालाहि जाहीर अथवा खाजगी, हा नाट्यप्रयोग अथवा यातील प्रवेश करता येणार नाही.

या सूचनेचे उल्लंघन केल्यास, दिग्दर्शक, कलाकर आणि त्या बेकायदेशीर प्रयोगाशी संबंधीत सर्व व्यक्ति यांच्यावर योग्य ती सर्व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**शरद तळवलकर**
सूत्राधार " मल्हार रंगमंच" पुणे.
आणि
**जयवन्त वालावलकर**

# आशीर्वाद

माझे युवक मित्र जयवन्त वालावलकर यांनी आपल्या लेखनाचा श्रीगणेशा आमच्या 'आनंद' मासिकात गिरवला हा आमच्या दोघातील प्रमुख भावबंध आहे. त्यातून त्यांचा पिंड चिकित्सेचा नसून भक्तीचा आहे आणि उच्च मूल्यांबद्दल त्यांना विशेष आस्था आहे. यामुळे मला त्यांचे विशेष कौतुक वाटते. प्रेम किंवा त्याग यांवरली त्यांची निष्ठा केवळ पुस्तकी नाही. प्रत्यक्ष अनुभवाच्या भट्टींत ही निष्ठा तापवून त्यांनी तीमधील हीण जाळले आहे व ती बावनकशी केली आहे. म्हणूनच त्यांच्या कलाजीवनाकडे मी आशावादी दृष्टीने पाहतो. प्रस्तुत 'बेलभंडार' या नाटकाला आशीर्वादरूप चार शब्द लिहिताना यामुळेच मला मोठा आनंद होत आहे.

'बेलभंडार' हे संपूर्ण ग्रामीण नाटक आहे. ते बोलीभाषेत लिहलेले आहे पण ती बोलीभाषा अवघड नाही. या भाषेच्या लयीचा थोडासा परिचय झाला तर भाषेचा जोम नव्हे तर अर्थही अधिक मनात भरतो. वालावलकरांचे संवाद रसाळ आहेत, याबद्दल त्यांचे मुद्दाम अभिनंदन केले पाहिजे. कारण आजकालच्या नाटकात बौद्धिकता आणि चिकित्सा एवढी वाढली आहे की, नाटक ही कला-क्रीडा नसून शस्त्रक्रिया आहे असा भास होतो! भावना उत्कट असल्या तर त्यांत विकृत मनाचे प्रदर्शन असावयाचे, नाही तर कोर्टातील दोन पक्षांच्या वकिलांप्रमाणे कंटाळवाणी भाषणे असावयाची! नवनाट्यातील या विकृती आणि रुक्षता यांच्या पकडीत वालावलकर सापडले नाहीत. वास्तव पण उत्कट, करुण पण उदात्त असे हे नाटक आहे. मराठी मनाचा अनुराग आणि राग दोन्ही यात समर्थपणे दाखविला आहे.

नाटकाचा नायक शिवा हा एक साधाभोळा शेतकरी आहे. त्याचे रागलोभ फार जलाऊ असतात. त्याला कष्टाची फिकीर नाही. भारतातील अगणित शेतकऱ्यांप्रमाणे तो सावकारी पाशात अडकलेला आहे. रोजगारासाठी त्याला शहरात धाव घ्यावी लागते आणि त्याचा उलट्या काळजाचा सावकार शिवाच्या संसारात विष कालवतो. साध्वी पत्नी आणि अत्यंत सालस मित्र यांचा चोरटा संबंध असावा असे शिवाला वाटते. आणि याच मत्सराने हे दोन जीव अस्मसात होतात! सामाजिक विषमतेने केवळ गरिबांचे संसारच दुःख-

मय होतात असेच नव्हे तर त्यांच्या सात्त्विक भावनाही निष्ठूर होतात. एके ठिकाणी तुंबलेला अर्थ हा भावजीवनातही अनर्थ करतो हे वालावलकरांनी अप्रत्यक्ष रीतीने सूचित केले आहे. साधी, प्रेमळ, एकमेकाच्या जीवाला जीव देणारी माणसें, पण समाजाच्या संपत्तीवर सर्प होऊन बसलेल्या धनिकांच्या फुत्कारांनी खाली कोसळतात. प्रचारकी थाट न आणता वालावलकरांनी गरिबांच्या दुःखाला वाचा फोडली आहे.

अमृता आणि बकुळा यांच्यातल्या भावना फार कोवळया आणि मधुर आहेत. बकुळाच्या नृत्यकौशल्यावर खूष असलेला अमृता ग्रामीण चित्रपटांतल्या पाटीलपुत्राप्रमाणें बहुधा बकुळाच्या प्रेमपाशांत पडून जीवन उध्वस्त करणार असे प्रथम आपणांला वाटते. पण येथे आश्चर्याचा गोड धक्का देऊन नाटककाराने भावनांची पातळी फारच उंच नेली आहे.मृत पत्नीच्या प्रेमाचे इमान राखणारा अमृता बकुळेचे प्रेम स्वीकारीत नाही. यांत कुणाला कृत्रिम उदात्तता दिसेल, पण संसारांतल्या साध्या माणसांत कित्येक तथाकथित श्रेष्ठ लोकांपेक्षा अधिक ध्येयवाद व अधिक त्यागबुद्धी असते याचा प्रत्यय ज्यांना आला आहे त्यांना यांत अकल्पित असे काही वाटणार नाही. अमृताच्या भूमिकेत ज्यांना अवास्तव वाटते त्यांचा मनुष्याच्या चांगुलपणावर विश्वास नाही असेच म्हणावे लागेल.

वालावलकर मूलतः कवि आहेत. 'कोंबड्यानं बांग' देऊन जागृत केलेली त्यांची काव्यप्रतिभा रसोत्कर्षात रमते. वास्तवाला शोभणारा काव्यात्मतेचा फुलोरा चढविते. प्रेमळ माणसाबरोबर मनसोक्त हसते आणि ढसढसा रडते. या भयंकर शोकांतिकेचा ताण गंग्या आणि त्याचे कुटुंब यांच्यातल्या प्रेमळ खडाष्टकाने थोडा कमी होतो. या एका नाटकांत सात्त्विक प्रेम, विरोधी प्रेम आणि त्यागमय प्रेम असे त्रिविध प्रेम रंगवून नाटककारांनी बहार केली आहे.

या नाटकांत दोष नाहींत असें नाहीं. अमृताच्या त्यागाची पार्श्वभूमि पहिल्यापासून तयार झालेली दिसत नाही. सावकाराच्या कुटिलतेचा स्फोट करणाऱ्या गंग्याने, इतका उशीर कां करावा हे कळत नाहीं! कदाचित् त्याचा भोपाळूपणा या दिरंगाईला कारण झाला असेल! आज खेड्यांतून नव्या पुरोगामी कायद्यांची व विज्ञानाधिष्ठित संस्कृतीची किरणें येऊन पोचत आहेत. त्याचा आढळ होणे जरूर होते. तथापि ज्या रांगड्या जीवनाचें चित्रण वालावलकरांना करायचे होते त्याला यामुळें बाध येईल असे त्यांना वाटले असावे. असो. पण अशा काही उणीवा जमेस धरूनहि नाटकाची ताकद मोठी आहे यांत शंका नाही. नाटकाचा शेवट सुखान्त केला असता तर नाटकाचे वास्तवरूप बिघडले असते. आहे तेच पर्यवसान बरोबर आहे. जीवनाच्या संग्रामात माणसें भडकली तरी आपापल्या थोर मूल्यांची जपणूक कशी करतात याचे चित्रण फार सुंदर झाले आहे. नाटकांत दुःख आहे, पण दैन्य नाही. हिंसा आहे पण क्षुद्रता नाही. अशाच तऱ्हेच्या प्रभावशाली कलाकृती वालावलकरांच्या हातून निर्माण होवोत असें आशीर्वादपूर्वक इच्छून त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**– गोपीनाथ तळवलकर**

त्याचप्रमाणे हेम्बॉल पब्लिसिटीचे श्री. राजन् खरे, या पुस्तकाचे मुखपृष्ठ चितारणारे माझे चित्रकार मित्र "स्टुडिओ प्रभा अॅडव्हर्टायझर्स" यांचं सहाय्य केवळ शब्दातींत.

आता मला दोन शब्द लिहिलेच पाहिजेत ते माझ्या नाटकाच्या टिकाकारांबद्दल. तसं नाटक सर्वांनाच एकदम आवडलं, पण त्यांचे मतभेद होते तपशीलाबद्दल. पण त्यांनी व्यक्त केलेली मतं इतकी परस्पर विरोधी होती की ती वाचून मी अवाकच झालो. कांहींनी म्हटलं होतं "लेखन सामान्य वाटले. साचेबद्ध वाटले. कांही व्यक्तिरेखा, कांहीं प्रसंग भडक वाटले. लेखकाजवळ भाषासामर्थ्य फारसे नाही. प्रयोग कलाकारांमुळें रंगतो." – तर कांहींनी जणू कांही या विधानांना छेद देण्यासांठीच म्हटलं होतं. "नाटकात मुळातच दम नसेल तर कलाकारही ते तगवू व रंगवू शकणार नाहीत.... लेखकाची हुशारी, संवाद चातुर्य व ग्रामीण मालमसाल्याची टापटीप मांडणी वाखाणण्यासारखी आहे.... नाटक ग्रामीण साच्याची कोंडी फोडणारे आहे."

व्यक्ति तितक्या प्रकृती या न्यायाने मतामतांच्या यां गलबल्यात माझा फायदा इतकाच झाला की, स्थितप्रज्ञ होण्यासाठी मला अन्य साधना करावी लागली नाही. तरीही या उलट सुलट टीकेबाबत माझ्याकडून उत्तर इतकेच की, प्रस्तुत नाटकांत "वास्तवा" चं स्वच्छ आणि स्पष्ट प्रतिबिंब पडलेलं असल्यामुळे प्रसंग आणि व्यक्तिरेखांच्या शक्याशक्यतेबाबत शंकाकुशंकांचा प्रश्नच उरत नाही.

पण मला खरी उस्फूर्त आणि उत्कटतेने दाद दिली ती माझ्या असंख्य अज्ञात प्रेक्षकांनी. आणि अर्थात अखेर मी पुढे लिहीत रहाणार आहे ते या प्रेक्षकांच्या आणि माझ्या समाधानासाठीच.

आजचं माझं हे आख्यान योगायोग महात्म्यावर आहे. असाच आणखी एक योगायोग. वास्तविक या नाटकाचं प्रकाशन होण्याचं अन्यत्र दोन तीन ठिकाणी घाटत होतं. पण योगायोग जमून आला तो अनमोल प्रकाशनचे धनी श्री. पद्माकर नांदूरकर यांच्याशी. आणि हा दुवा जोडण्याचं श्रेय माझे मित्र श्री. अनंतराव फाटक व श्री. बबनराव गोखले यांना आहे. पुस्तक माझ्या मनपसंत प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने माझे सर्व लाड प्रकाशकांनी पुरविले.

तसेच स्वानंद मुद्रणालयाचे धनी श्री. वि. ना. भंडारे आणि त्यांचे सहकारी यांनी मुद्रणाचे कामी माझा सहन केलेला त्रास आणि कटकटी, आणि तरीही कर्तव्यपूर्तीसाठी त्यांनी दाखविलेली चिकाटी यांना सीमा नाही. आणि म्हणूनच प्रकाशकांनी त्यांचा मानावयाचा आभाराचा हक्क मी हिरावून घेत आहे.

१५ ऑगस्ट १९७० **जयवन्त दळवी वालावलकर**

सौर २४ श्रावण शके १८९२
६४८ बुधवार पुणे २.

# "बेल भंडार" वर

## एकमुखाने झालेली, गौरवाची आणि कौतुकाची उधळण

"**बेल भंडार**"च्या रौप्य महोत्सवाचे अध्यक्ष जेष्ठ व श्रेष्ठ साहित्यिक पं. महादेवशास्त्री जोशी, रसिकश्रेष्ठ श्री. गोपीनाथराव तळवलकर, खानदेशचे डॉ. उत्तमराव पाटील, "मृत्युंजय"कार शिवाजी सावंत यांच्याप्रमाणेच असंख्य ज्ञात अज्ञात रसिल्या प्रेक्षकांनी "बेलभंडार" च्या "उत्कृष्टते" वर शिक्कामोर्तब केलेच, पण वृत्तपत्रेही स्तुतीवर्षावांत आघाडीवर राहिली–

In BELBHANDAR writer successfully catches the even tenor of Life in the Village.

– **टाईम्स ऑफ इंडिया**

प्रेक्षकावर चटकन छाप पडावी इतक्या ताकदीचे, संघर्षात्मक नाट्य या नवीन ग्रामीण नाटकामध्ये आहे. आणि नाट्य फुलवताना तमाशा, लावण्यांचा वापर करण्यात आला असला तरी मूळ कथानकाला पूरक असेच त्याचे स्वरूप आहे. – **माणूस**

करमणूक, मनोरंजन त्याबरोबरच कांही जीवनस्पर्शी विषय अशा दुहेरी स्वरूपातील हे नाटक, कलावंतांच्या योग्य सहकार्याने एक नीटनेटका प्रयोग पाहिल्याचे समाधान देऊन जाते. – **सकाळ**

विषय हृदयांस स्पर्श करून जाणारा, जीवनातील उदात्त भावनांची जपणूक करणारा आणि मांगल्याचे रक्षण करणारा असा असल्याने तो अवास्तव वाटत नाही. श्री. जयवंत वालावलकरांचे संवाद लेखनाचे कसब खरोखरीच कौतुक करण्यासारखे आहे. – **केसरी**

भावनेला स्पर्श करणारी कथा आणि तिला लावण्या, नृत्ये आणि विनोद यांची जोड, हे मिश्रण लेखकांने मोठ्या हुशारीने वापरले आहे. – **मराठा**

झोपाळू गडी गंग्या आणि सोंगाड्या बापू ही पात्रे लेखकाने चांगली निर्माण केली आहेत. गुणी कलावंतामुळे प्रयोग रंगतो.

– **महाराष्ट्र टाईम्स**

लवकरच रंगभूमीवर येत आहे--

**'बेल भंडार'** च्या घवघवीत यशानंतर
तुमच्या चाकोरीबद्ध रूढ कल्पनांना
हादरे देणारे संसार नाट्य--

# सूनबाई,
# घर तुझंच आहे

लेखक :
**जयवन्त वालावलकर**

कलाकार :
अर्थातच सर्व आघाडीचे.




कै. शंकरराव चंदेल

**प्रिय दादा–**

वाऱ्याबरोबर येणाऱ्या
सुगंधासारखे
क्षणकालच
सहवासांत आलांत
आणि–
जन्माची हुरहूर, रुखरुख लावून
कायमचे निघून गेलांत.
त्या तुमच्या पवित्र स्मृतींना–

**– जयवन्त वालावलकर**

# " बेल भंडार "

या नाटकाचा प्रथम प्रयोग " मल्हार रंगमंच " पुणे, या संस्थेच्या वतीने " **भावे नाट्य मंदिर** " सांगली येथे रविवार दि. २ नोव्हेंबर १९६९ रोजी रात्री ९॥ वा. झाला.

दिग्दर्शक:–गोविंद कुलकर्णी
संगीत:–बाळ पळसुले
नृत्य:–व्ही. मोहनकुमार

कलाकार :

गंग्या:–शरद तळवलकर
चंद्रा:–लता थत्ते
पारू:–सौ. सुहासिनी देशपांडे
शिवा:–प्रभाकर मुजूमदार
अमृता:–अरुण सरनाईक
बकुळा:–नलिनी चोणकर
बाप्या:–राघवेंद्र कडकोळ
सावकार:–गोविंद कुलकर्णी

पार्श्व-गायिका:–सौ. लीला कारेकर
ऑर्गन:–एकनाथ चव्हाण
क्लारोनेट:–सदाशिव सुतार
ढोलकी:–बबन काळे

ध्वनिसंयोजन व
रंगमंच व्यवस्था–
जयवन्त वालावलकर
वसंत दाते, भाऊ गोळे

नेपथ्य–केळकर चित्रशाळा, पुणे
प्रकाश योजना:–रघुनाथ थत्ते
रंगभूषा–वेषभूषा:–दत्तोबा भडाळे
व्यवस्था:–चंद्रसेन शहा

सूत्रधार:–शरद तळवलकर

# बेल भंडार

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

( तिसरी घंटा होताच ढोलकीचा तुकडा वाजतो. पार्श्वसंगीत सुरू होते. 'श्रेय'कारांचा परिचय करून दिला जातो आणि तुतारीच्या निनादात पडदा वर जातो. कव्हर पडद्याच्या चौकोनी जाळीतून जेजुरीचा खंडोबा दृश्यमान होतो. त्याच्या पुढे दोन पुरुष व्यक्ति व एक स्त्री व्यक्ति शिवा पारु अणि अमृता प्रेक्षकांना पाठमोऱ्या उभ्या असून मल्हारीस पंचारतीनें आळवीत आहेत. )

खंडेराया देवा मल्हारी,
तूच आता आमुचा कैवारी
आलोय योजून काही,
धाव तुम्या घेतली पायी
लई काय मागणं न्हाई,
कृपाछत्र असू दे शीरी.
तूच आता आमुचा कैवारी–
मल्हारी तूच शंकरा,
उधळला बेल भंडारा
नटेश्वरा सेवा स्वीकारा
मांडलं ठाणं हे द्वारी.
खंडेराया देवा मल्हारी––

( स्तुती पूर्ण होताच शिवा अमृता हातांत "बेलभंडार" घेऊन "खंडोबाची आण" घेत आहेत. )

**शिवा व अमृता :** देवा खंडोबाराया मी शिवा पवार आणि माझा दोस्त अमृता जाधव दोघंबी आमच्या कुळात पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या रिवाजापरमानं 'बेलभंडार' अुचलून तुझ्या पायाची आण घेत आहोत की आयुक्षात कंचा बी भला वाअीट परसंग आला तरी आमी एकमेकासनी अंतर देणार न्हाई. सख्या भावापरमानं एकमेकांच्या पाठीशी न्हावू. तुझा आमाला आशीर्वाद असू दे"

(असे म्हणून खंडोबावर बेलभंडार अुधळतात आणि पुन्हा देवाला नमस्कार करून एकमेकांना मिठी मारतात. तिथून निघून परत फिरतात. आणि परत फिरल्यावर रंगमंचावर हळूहळू अंधार होऊन दृश्य पूर्ण होते. त्यात कव्हर-पडदा वर जातो. )

## प्रवेश दुसरा

( पुन्हा प्रकाश येतो रंगमंचावर ग्रामीण वातावरण. प्रेक्षकांचे डाव्या हातास शिवा पवाराच्या घराची दर्शनी बाजू. समोर पडवी. त्या लगतच रंगमंचाचे मधोमध अमृता जाधवाच्या घराची दर्शनी बाजू. सुरेख सुबत्ता दर्शविणारी ओसरी. निरनिराळ्या जनावरांची अमृताने केलेली शिकार चित्रे, गादी, तक्क्या, आदींनी सुशोभित ओसरीवरील बैठक, आणि आजूबाजूला शेतकी अवजारे. अमृताचे घरालगतच प्रेक्षकांचे उजव्या हातास अमृताच्या घरगड्याची छोटीशी राहाती जागा. या तिन्ही घरात अमृताचे घर अधिक उठावदार व सुसंपन्न दिसावे. वेळ भल्या पहाटेची. सुरुवातीस रंगमंचावर कोणीही नाही. गंग्या अमृताचा अत्यंत झोपाळू गडी डोक्यावरून घोंगडे गुरफटून प्रवेश करतो आणि झोपण्यासाठी आडवा होत असतानाच जवळच्याच डालीतील कोंबडे आरवते. )

**गंग्या :** (स्वगत) - आं रात झाली कां उजाडलं ? कां कोंबडं झोपेत वरांडलं! कुठं बी जावा अगदी चंद्रावर जरी गेल्यासा तरी काय ही माणसं तिथंबी बिनघोर झोपू द्यायची न्हाईत. तितली माती तरी आना म्हणतील. खड्डा तरी खना म्हनतील. न्हाई तर तीथं इंजान तरी बसवून या म्हणतील. लअी म्हंजे लअी वैताग आनलाय या मानसानी. आनी कोंबड्यानींबी (खालीवर घोंगडे घेअून गंग्या झोपतो. कोंबडं परत ओरडतं. गंग्या उठून, ) तू बोंबालरं मी झोपनार ( झोपतो )

**चंद्रा :** (आतुनच) **बाई उठता बसता । सय म्हायेराची येते** (पहिली ओळ-पूर्ण होताच)



**गंग्या :** आरं देवा कोंबडं झालं. आतां हे पाटलाचं कार्ट. जवा बगावं तवा रेडिओ लावून बसतं. पर मी झोपनारच-(झोपतो)

**चंद्रा :** (प्रवेश करून) **बाई उठता बसता । सय माहेराची येते । म्हनून मी**
**येडी भोळी । गानं आपसूक गाते ।।**

**गंग्या :** ( ती गेल्यावर तोंडावरील घोंगडे बाजूला करीत ) हिचं म्हायेराचं दळाण सुरूं झालं वाटतं. आता वाजलं झोपचं बारा. (तोंड झाकून घेतो.)

**चंद्रा :** ( प्रवेश करून) **काय सांगू शेजीबाई । थाट माझ्या माहेराचा ।**
**तालेवार भावाला ग । राम राम पाटलाचा ।।**

**गंग्या :** (पुन्हा तोंड बाहेर काढीत) हाण थापा. अग कुत्रं तरी अिच्यारतं का तुझा भावाला गावात कोन. म्हनं राम राम पाटलाचा. थापा मारती काय थापा मारती ? भिकारडी कुटली ( तोंडावर घोंगडे घेतो )

**चंद्रा :** **सात चौकी वाड्यामंदी । जशी जत्रा दीस रात ।**
**एका टायमाला गं शिजतो । सात पायलीचा भात ।।**

**गंग्या :** (तोंड बाहेर काढीत) अग ये .. चूल तरी पेटती का सांजला ? किती बनवतीस सोताला किती बनवतीस ? म्हनं टायमाला सात पायलीचा भात शिजतो. अग समद्या वर्साला तरी शिजतो का गं अेवढा भात ? (तोंडावर घोंगडे घेतो)

**चंद्रा :** **किती नोकर चाकर । उभे दारी मुजऱ्याला ।**
**पाच इसा पगार गं । एका एका हुजऱ्याला ।।**

**गंग्या :** (रागानं अुठून बसला आहे) मग भाऊ का बोंबलत हिंडतो रोजगारा-पाई. मला वाटतंय तुझा भाऊ जितं हुजऱ्या म्हणून मुजऱ्याला असतोय त्याचं कौतुक चालवलस तूं. ( पुन्हा घोंगडं घेऊन गुरफटून झोपतो. हळूहळू रंगमंचावर अंधार होतो. चंद्रा आपल्या घरातून कंदिल घेऊन अमृताच्या घरात जाते. रंगमंचावर पुन्हा प्रकाश येतो. दरम्यान बारा तासांचा अवधी गेल्याचे सूचीत होते.)

## प्रवेश तिसरा

(तरीही गंग्या आहे तिथंच घोरतो आहे. वेळ दिवे लावणीची. घोरणाऱ्या गंग्यावर चंद्राचा-गंग्याच्या बायकोचा तोंडाचा पट्टा सुरू होतो.)

**चंद्रा :** वसाडी आली हयांच्या झोपवर. अवं उठा, उठा, दिस न्हाई, रात न्हाई, काळ न्हाई येळ न्हाई. जवा बघावी तवा झोप, झोप, झोप ! लई झोपू ने मानसानं. दळींदर येतं म्हून सांगितलं तरी काय हयेंचं डोळं उघडत

न्हाईत अजून. असली कसली झोप म्हनते मी ? अव उठा ( गंग्या मोठ्यांदा घोरू लागतो.)

**गंग्या :** (झोपेतच) न्हाई उठणार, चंद्रे लावनी पुरी कर. तवाच उठन.

**चंद्रा :** आग लागली तुमच्या तमाशाला आन लावनीला. आता माझ्या पायात तेवढं चाळ बांधून मला नाचाय लावा तमाशात, म्हंजे सुटल्यासा. अवं उठा.

**गंग्या :** न्हाई उठनार. आदी लावनी पुरं कर, न्हाई तर पैसं टाक माझं त्याच्या शिवाय उठनार न्हाई. तुज्या बानं ठेवल्यात व्हय पैसं.

**चंद्रा :** तुमी तसं उठनार न्हाईसा. (अंगावर धावून जाते. त्याला उठवून बसवते. गंग्या अफलातून झापाळू आहे. त्याचे डोळे मिटलेलेच आहेत. उठवून बसवताच दुसऱ्या बाजूस पुन्हा कलंडतो, ती त्याला पुन्हा बसवते.) अव काय झोप म्हनायची का स्वांग. अव दिस डुबून घटका आली. उठा. (तरीही तो जागा होत नाही) आता काय म्हनावं या करमाला म्हनते मी. थांबा तुम्ही तसं उठनार न्हाईसा. (आतून पाण्याचा तांब्या आणून त्यातले पाणी पाचकन त्याच्या तोंडावर मारते. गंग्या जागा होतो.) काय हो, कधी जायाचा ह्यो तुमचा झोपचा रोग ?

**गंग्या :** (डोळे चोळत) काय म्हनालीस ?

**चंद्रा :** न्हाई म्हनलं कधी जायाचा ह्यो तुमच्या झोपचा रोग ?

**गंग्या :** आता आमच्या बरबर एकदमच जायाचा. हे बघ ते जाऊ दे. पयलं च्याला ठेव, आन पानी तापवून दे आंघुळीला. मला मळ्याकडं जायचंय उसाला पानी द्याय सांगीतलंय मालकानं.

**चंद्रा :** (आश्चर्यानं) आं काय डोक्स बिक्स फिरलं कां काय ? आता आनी उसाला पानी ?

**गंग्या :** कां पहाटं ऊस पानी पीत न्हाई ?

**चंद्रा :** पहाट, अवं कुटली फहाट, दिस डुबून दिवं सुदीक लागून गेलं. सुध्दीवर हाईसा न्हवं ? काय तमाशाबरबर बाटली बिटली झोकाय लागल्यासा ?

**गंग्या :** म्हंजे रात झालीया म्हन की.

**चंद्रा :** अव म्हन की काय रातच झालीया. वाईच डोळं फाडून बघा भाईर. कवा झोपलातासा ठाव हाय का तुम्हाला ?

**गंग्या :** कवा म्हंजे दोपारी.

**चंद्रा :** अव दोपारी कुठलं ? भल्या फाटंला. पयल्या कोंबड्याला झोपला व्हतासा. दोपारच्याला जेवायसाठी तुम्हाला उठवून उटवून दमले आन मग दोन घास गिळलं मी.



**गंग्या :** हां तेवढं बरं केलंस.

**चंद्रा :** आनी काय हो ! झोपत सुद्धा तमाशाच बघत्यासा वाटतं ? कुठल्या चंद्रीला दम देत व्हत्यासा ?

**गंग्या :** कोन मी ?

**चंद्रा :** व्हय व्हय तुमी, ह्या ह्या कानानं ऐकलंय मी. 'चंद्रे लावनी पुरी कर तवाच उठन. न्हाईतर पैसं टाक माझं.' म्हनून बडबडत व्हतासा.

**गंग्या :** छॅ छॅ म्या नसलं.

**चंद्रा :** अवं मी ह्या कानानं सोना ऐकलंय म्हनून सांगते नव्हं.

**गंग्या :** हां मग झोपत त्वांड बडबडलं असंल.

**चंद्रा :** हां झोपेत त्वांड बडबडतं. देवाच्या नांवानं न्हाई कुट बडबडत ते ? मला तुमी एक सांगा. तुमाला माजासंग नीट संसार करायचा हाय का रातचा तमाशा आन दिसा झोप असंच दिस काडायचं हाईत ?

**गंग्या :** तसं दिस काढलं तर काय करशील ग ?

**चंद्रा :** सरळ उठून म्हायेराला निघून जाईन. कटाळा कटाळा आलाय मला या संसाराचा आन् तुमच्या वागन्याचा.

**गंग्या :** कवा बी जा, आपली सोडचिठ्ठी लिहून तयार हाय.

**चंद्रा :** काय सोडचिठ्ठी ? काय लाज-बीज वाटतीया काय सोडचिठ्ठीची भाषा कराया ? पयल्या दोन घालवून बसल्यासा आणि अता म्हातारपनी लगीन करून माझं वाटोळं केलासा. अवं येवडं होतं तर हे लगीन तरी कशाला केल्यासा म्हनते मी ?

**गंग्या :** गाडावपना झाला. परत असला गाडावपणा करनार न्हाई.

**चंद्रा :** आनी आता फिरून गाडावपना करतो म्हनल्यासा तरी फिरून तुम्हाला पोरगी देन्याचा गाडावपना कुटलाबी बाप करनार न्हाई. आनी धेनात ठेवा म्हटलं म्हनून मी काय म्हायेरला जानार न्हाई ? हीतंच न्हानार हाय आनी तुमास्नी वटनीवर आननार हाय.

**गंग्या :** लई कठीन हाय चंद्रे, मला वटनीवर आननं, लई कठीन हाय. अगं खेकड्याची चाल माझी. कशी आनी कवा सुधारनार हायीस सांग बरं तू ?

**चंद्रा :** म्हनजे काय बी झालं तरी सुधारनार न्हाईसा म्हना की.

**गंग्या :** अगं खुळ का काय ? मानसानं सुधारन्याचं बी दिस असतात. कातडं इतकं निबर झाल्यावर आता कुटला सुधारतोय मी ?

**चंद्रा :** ठीक हाय. मग येऊ देतच आज मालकास्नी, त्येसनीच इचारते ह्याच्यावर तोड.

**गंग्या :** अिच्यार अिच्यार. त्यो सांगल बरका ह्येच्यावर काय तरी वशीद. बरमदेवच त्यो. आगं माझ्या म्होरं परमेसुर सुदीक आडवा व्हईल तितं मालकाची काय कता. (गंग्या बाहेर जाऊ लागतो.)

**चंद्रा** : पुरं झाला फाजीलपना. पर आता कुटं चालल्यासा तुमी ?

**गंग्या** : तेबी सांगाय पायजेच का तुला ? कुटं बी जाअीन आनी कवाबी अीन. ज्येच्या तेच्यात त्वांड खुपसु नगस.

**चंद्रा** : कां ? लअी आवाज चढवल्यासा आज ?

**गंग्या** : म्हंजे, नवरा हाय मी तुजा. बायकोनं पायातलं जीतं ठेवल्यात त्या जागेला सोभल असंच बोललं पायजे.

**चंद्रा** : ती बायको मी न्हवं बर का ? येळ पडली तर त्येच हातात घ्यायला कमी करनार न्हाई मी. ठेवीन नवरा खुटीला टांगून. तवा समजल मी कोन हाय ते ! (चंद्राचा आवाज चढलाय तेवढ्यात शिवाची बायको पार्वती एका हातात पणती आणि एका हातात कंदिल घेऊन बाहेर येते. आणि आपल्या दारात कंदील अडकवते.)

**पारू** : (हंसतच ) काय गं चंद्रा, आज लई आवाज चढलाय ?

**चंद्रा** : अवं न्हाई तर काय. कुठल्या जल्मी पाप केलतं म्हनून असल्या कर्माबरबर गांठ पडलीया.

**पारू** : अगं होय. पन काय झालं तरी नवरा हाय त्यो तुजा. कसाबी असला तरी नांदायाच पायजे त्याच्या बरबर.

**गंग्या** : शिकवा, शिकवा वैनी तिला, कस वागायचं असतं नवऱ्याबरोबर ते. लग्नाची बायको म्हन ही. जवा तवा तोंडाचा पट्टा सुटलेला.

**चंद्रा** : नशीब समजा. त्ये पट्ट्याचं फटकं अंगावर न्हाई बसत.

(पार्वती पणती तुळशीपुढे ठेवायला येते.)

**गंग्या** : वैनी ती पणती त्या तुळशीम्होरं ववाळण्यापरीस ह्या चंद्रावरनं ओवाळा. अगदी म्हैशासूरमर्दीनी आई जगदंबेवानी दिसतीया बघा. नांव चंद्रा आनी अवतार जगदंबेचा.

**पारू** : अशी पन चेष्टा बरी न्हवं गंगाराम. अरे ह्या पाईच भांडणं होत्यात.

**चंद्रा** : शिकवा, शिकवा वैनी त्येस्नी. बायकोसंग कसं वागायचं असतं ते.

**पारू** : तुला पन त्येच सांगते चंद्रा, आपून बाई मानसाच्या जातीनं थोडं पडत घ्यावं. असं तोंडाला तोंड देनं बरं दिसत न्हाई.

(पार्वतीची नजर चुकवून अेकमेकांची 'कशी झाली' अशा अर्थी दोघेही एकमेकांकडे पहातात. तोच बाहेरून शिवा 'गंग्या अरं ए गंग्या,' अशी हांक येते. आणि हाकेपाठोपाठच शिवा लंगडत काठी टेकीत प्रवेश करतो. चंद्रा चटकन् चेहरा पदराआड करून आत निघून जाते.)

**गंग्या** : काय री.



**शिवा** : गोट्यात जाउन तेवढी बैलं निट बांधून घे. (कण्हत) तशीच सोडून आलोय. पायऱ्या चढून गोट्यात जायला जमना बाबा.

**पारू** : (एकदम धावतच शिवाजवळ जाते.) पर पायाला काय झालं हो धनी ?

**शिवा** : अगं बैलानं पाय दिला पायावर. काय करायचं. तमाशा, कुस्त्या अन् शिकारीपाई तुझ्या भावजीला येळ न्हाई शेताकडं ध्यान द्यायला आन गंग्याला झोपंपुढं काई सुधरत न्हाही. (गंग्या शरमून खालच्या मानेनं निघून जातो.) म्हनून आमी उसाभर करायला गेलो आनी बसलो पाय तुडवून घेऊन.

**पारू** : पर असा कसा पाय तुडवला म्हन्ते मी बैलानं ?

**शिवा** : आता कसा ? त्यो गोपळ्या बैल काय गुनाचा ठावं हाय न्हवं तुला, जरा जवळ घेऊन त्याला कौतुकानं चुचकाराय गेलो आन त्यानं हाणली झालं लाथ.

**पारू** : (त्याला हलकेच आपल्या दारात नेऊन बसवोस ) पर कशापाओी म्हन्ते त्याच्या वाट्याला गेल्यासा. तुम्हास्नी ठावं हाय नव्हं कसा हाय बैल त्यो ?

**शिवा** : व्हय पारू. पर गडी मानसाला सोवत न्हाई इतका भितरेपना. जनावराची सव व्हायलाच पायजे तेच्या बरोबर काम करनाऱ्या गडीमानसाला. रानात वावरायचं म्हंजे बांगड्या भरून न्हाई चालत आमाला. अगं हे चालायचंच.

**पारू** : थांबा. मी घरातनं इटकर घेऊन येते शेकाय. (उठू लागते.)

**शिवा** : (पुन्हा तिला बसवीत.) अगं बस. समदं वशेदपानी केलंय त्या रानातल्या घेवड्याच्या म्हातारीनं. पर पारू मला असं सांग कधी गं अक्कल यायची आमच्या आमृताला ? आज चार दिस झालं ह्यो कुटं उंडारलाय त्येचा अजून पत्या न्हाही घराकडं.

**पारू** : पर मी म्हन्ते तुमी कशासाठी काळजी करतासा. त्येचं तेस्नी समजत न्हाई व्हय बरं वाईट.

**शिवा** : ते समजत असतं तर त्यो असा वागला नसता, आठ दिसाच्या मागंपून त्याला वरडतोय. कामाला मानसं सांगून तेवढं पिकातलं तण काढून घे म्हून. पर ह्यो नंदीबैलागत निस्ती मान हालावतोय आन निघून जातोय तमाशाला न्हाईतर शिकारीला. मला तरी काय ह्येचं लक्षण ठीक दिसत न्हाई पारू. आपल्या हातानं ह्यो एक दिस आपल्या पायावर धोंडा पाडून घेनार बघ.

**पारू** : हुं. धोंडा पाडून घेत्यात. मस्त समाजतंय ध्या ज्येचं त्येला. काय कोन बोळ्यानं दूध पित न्हाई.

**शिवा** : तुझं असं हाय पारू. मी काय सांगाय गेलो कीं तू मला टांगाय जातीस. त्यो करतोय त्यो समदा शानपना आणि मी म्हनतोय त्यो गाडावपना

**पारू** : तसं न्हवं धनी. पन मी काय म्हनते–

**शिवा** : तू काय बी सांगू नगस त्याचं मला. लहानपनापासून मी वळखतोय त्येला. तो वर्साचा असताना त्याची आई गेली अन अक्कल फुटली तसा बा गेला. आन लगीच व्हून दोन वसं झाली न्हाई तवर बाईल गेली. आता तर काय त्येला कोनाचा धाक न्हाई. कोन जाव ईचारनार न्हाई. हयो करील त्ये खरं. दुसरं लगीन कर म्हटलं तर न्हाई म्हनतोय. त्याचं कारन मला इच्यार. मग असं उंडगाय कुठनं मिळनार ? जळता जळणार न्हाई एवढो हयेची इस्टेट हाय. हयो जर असाच जागाया लागला तर भिकला लागाया कितीसा येळ लागणार ?

**पारू** : तुमचं म्हननं खरं हाय. पर आपला त्येंच्यावर हाक्क थोडाच हाय. काय बी झालं तरी दोस्तीचं नातं. जेवढं जमलं तेवढं सांगून बघायचं.

**शिवा** : कां ? निसती दोस्ती काय म्हनून. धाकल्या भावासारा मानतो मी त्याला. धा पिढ्या ही पवार–जाधवाची घरानी एकमेकांच्या शेजाराला हायीत. दोन घरं येगयेगळ्या ठिकानी हायीत म्हनूनच दोन म्हनायची. येकाला लागलं तर दुसऱ्याला कळ उठतीया इकता जीव हाय हया दोन कुळांचा अेकमेकांवर. मग परकापना काय म्हनून? माझ्या डोळ्याम्होरं तरी येवड्या मोठ्या दौलतीची राख होऊ देनार न्हाई मी.

**पारू** : व्हय. पर आता उगच जीवाची काहीली काय म्हनून. त्ये आल्यावर त्यास्नी काय सांगायचं त्ये सांगा थंडपनानं.

**शिवा** : तुझ्या इकता थंडपना न्हाई ग माझ्या अंगात. आपलं काम म्हंजे अेक घाव दोन तुकडं.

**पारू** : व्हय. पर आता जरा थंडपनानं हातपाय धुवून जेवाय चला बघू.

**शिवा** : म्हनजे आता सुदीक अमृता जेवाय येनार न्हाई ?

**पारू** : अवं असं काय करतांयसा. मला त्ये काय सांगून गेल्यात काय ?

(गंग्या प्रवेश करतो.)

**शिवा** : काय रे ए गंग्या, कवा यायचा तुझा मालक लडाअिस्न ?

**गंग्या** : काय ठावं न्हाई मला.

**शिवा** : चाललंय ते ह्याक चाललंय बघ. त्यो तिकडं बायका नाचवित फिरू दे आन तु हिकडं दिसरात निवांत घोरत जा. होऊ दे पिकपान्याची माती. आरं राजाचं जितं बेताल झालाय तिथं परधानाला चाप लावून काय उपेग ?

**गंग्या** : तसं न्हवं. पन...



**शिवा** : तसं न्हवं काय मर्दा. तुझी काय झोप म्हनायची का काय ? आज दोन दिस उसाला मी पानी देतोय. अरं असं जर कराय लागलास तर उसाचं चिपाडसुदीक हाताला लागायचं न्हाई.

**गंग्या** : उद्यापासनं जाईन मळ्याकडं.

**शिवा** : बघ बाबा जमलं तर. आन तुझ्या मालकालाबी सांग कंच्याबी गोष्टीला हाद पायजे म्हनावं. काय तरी परपंचाच बघा आता.

**गंग्या** : छॅं छॅं म्या काय सांगतोय ? हये मालकास्नी मी सांगायचं म्हंजे मांजराच्या गळ्यात घाट बांधन्यासारं हाय.

**शिवा** : पर तुझ्या संवयीचं हाय ते मांजर. अरं फिस्कारायचं सुदीक न्हाई तुझ्यावर (अमृताः "गंग्या अरं ए गंग्या. जागा हाईस का झोपलाईस" म्हणून हाक मारतो.)

**गंग्या** : न्हाई आज जागा हाय.

**अमृता** : (प्रवेश करतो, शिकारी वेश, खांद्याला छऱ्याची बंदूक, एका हातात मारलेले उलटे धरलेले कवडे) गंग्या हये कवडं झॅक सोलून दे बघू वैनीला. फरमास बेत झाला पायजे बरं का वैनी. शिवादासाटनं ताजं मारून आनल्यात. (पारू, शिवा चुपचाप. शिवा संतापला आहे. गंग्या गुपचूप कवडे घेऊन सोलण्यासाठी आपलया घरात निघून जातो.)

**अमृता** : शिवादा, तुझ्या पायाला रं काय झालं ?

**शिवा** : तुझ्या बैलानं परसाद दिला.

**अमृता** : (त्याच्याजवळ जात.) म्हंजे काय झालं काय ?

**शिवा** : आज सकाळी उसाला पानी पाजाय गेलो तवा तुडवल्यानं.

**अमृता** : पर तू का गेलास. गंग्या कुटं गेलता.

**शिवा** : त्येलाच इचार की

**अमृता** : गंग्या, अरं ये गंग्या (गंग्या आंतूनच "कालवाण शिवादासाला आनलय, न्हाईतर तूच खाशील मटा मटा" म्हणत प्रवेश करतो.) काय रं. आज उसाला पानी द्यायला का गेला न्हाईस.

(गंग्या गप)

**अमृता** : काय रं काय इचारतोय मी ?

**गंग्या** : (चाचरत) हं अं झोपलो व्हतो.

**अमृता** : झोपलो व्हतो ? गंग्या खरंच एकदा आता दागदाराला तरी दाखवून घे तब्बेत. आरं काय झोप म्हनायची का काय ? तुझ्या जीवावर एवढा बारदाना सोपवून भाईर जायची सोय न्हाईली न्हाई आता. अरं होईत नसलं हातनं काम, तर तसं सांग म्हनजे तशी दुसरी जोडणी कराय